


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३८१ वा बुधवार दि ०३ जून २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# विधान परिषदेत माघार, ५२ मतदारांची ताकद वाया, ठाकरे गटात असंतोषाची ठिणगी, कदम बैठकीलाच थांबले नाहीत...

**वृत्तसंस्था नाशिक**

नाशिक विधान परिषद निवडणुकीतून शिवसेना ङ्गउबाठाफ्ने माघार घेतल्यानंतर पदाधिकारी आणि नगरसेवकांमध्ये असंतोषाची ठिणगी पडली आहे. ५२ मतदार असतानाही निवडणूक न लढवणे आश्चर्यकारक असून, लढून पराभव स्वीकारणे योग्य होते, असा सूर शिवसेना उबाठा गटातील पदाधिकारी व नगरसेवकांमध्ये आहे. पक्षात निर्माण झालेला असंतोष शमविण्यासाठी शिवसेना नेते खासदार संजय राऊत बुधवारी (दि. ३) नाशिकमध्ये येऊन पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. शिवसेना उबाठातर्फे माजी आमदार वसंत गिते, अनिल कदम यांनी उमेदवारी अर्ज घेतल्यामुळे या दोघांपैकी एक निवडणूक रिंगणात उतरेल अशी चर्चा होती. परंतु, अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी (दि. २) निवडणूकच न लढवण्याचा निर्णय जाहीर करत ठाकरे गटाच्या नेत्यांनी सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. या भूमिकेमुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिवसेना यांच्या नेतृत्वातील शिवसेनेला ङ्गबायफ मिळाल्याची चर्चा सुरू झाली आहे. वधान परिषद निवडणुकीत सुरु असलेला घोडेबाजार मान्य नसल्याचा दावा करत, आपल्याला या पापात वाटेकरी व्हायचे नाही, म्हणून ङ्गउबाठाफ्ने निवडणुकीत उमेदवार दिला नसल्याचे स्पष्टीकरण नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख रवींद्र मिर्लेकर यांनी दिले होते. माजी आमदार अनिल कदम निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असताना ऐनवेळी गटनेते केशव पोरजे यांना निवडणूक लढवण्याचा सल्ला संपर्कप्रमुखांनी दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे नाराज झालेले कदम बैठकीला न थांबल्याची चर्चा शिवसैनिकांमध्ये आहे. वधान परिषद निवडणुकीत सुरु असलेला घोडेबाजार मान्य नसल्याचा दावा करत, आपल्याला या पापात वाटेकरी व्हायचे नाही, म्हणून ङ्गउबाठाफ्ने निवडणुकीत उमेदवार दिला नसल्याचे स्पष्टीकरण नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख रवींद्र मिर्लेकर यांनी दिले होते. माजी आमदार अनिल कदम निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असताना ऐनवेळी गटनेते केशव पोरजे यांना निवडणूक लढवण्याचा सल्ला संपर्कप्रमुखांनी दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे नाराज झालेले कदम बैठकीला न थांबल्याची चर्चा शिवसैनिकांमध्ये आहे. पक्षाची ताकद दाखवण्यासाठी निवडणूक लढवायला हवी, अशी काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची इच्छा होती. पक्ष कार्यकर्ते आणि मतदानाचा अधिकार असलेल्या नगरसेवकांच्या मते, किमान उमेदवारी अर्ज माघारीच्या




दिवसापर्यंत निवडणुकीची उत्सुकता कायम ठेवायला हवी होती. मविआच्या जागावाटपात नाशिकची जागा शिवसेना उबाठाफ्क्डे आली होती. परंतु, उबाठाकडून अर्ज दाखल न झाल्याने घटकपक्ष राष्ट्रवादी शप व काँग्रेसमध्येही नाराजी निर्माण झाली. हा असंतोष शमविण्यासाठी अपक्षांना अप्रत्यक्ष मदत करण्याचा डाव आखला जात असल्याची चर्चा आहे.

---

# काँग्रेसचे नेते पवारांच्या राष्ट्रवादीवर संतापले, सुप्रिया सुळेंसमोर जाहीर नाराजी; पुण्यात मविआच्या बैठकीत नेमकं काय घडलं?

**वृत्तसंस्था पुणे**

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीची एकजूट दाखविण्यासाठी मंगळवारी काँग्रेस भवन येथे खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. मात्र, व्यासपीठावर ऐक्याचे संदेश दिले जात असताना बंद दाराआड झालेल्या चर्चेत काँग्रेस नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केल्याची चर्चा आहे. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीतील कटू अनुभव, काँग्रेसविरोधात उभे राहिलेले ङ्गराष्ट्रवादीफ्चे उमेदवार हे मुद्दे काही नगरसेवकांनी सुप्रिया सुळे यांच्यासमोर उपस्थित केले. त्यामुळे ङ्गमविआफ्तील धुसफूस संपली नसल्याचे स्पष्ट झाले. अनेक नगरसेवकांनी गत निवडणुकांतील अनुभव मांडताना नाराजी व्यक्त केली. महाविकास आघाडीचा भाग असतानाही आमच्या विरोधात उमेदवार का उभे करण्यात आले, भविष्यात महापालिकेत ङ्गराष्ट्रवादीफ्ची नेमकी भूमिका काय राहणार आहे, असा थेट सवाल काहींनी उपस्थित केल्याचे समजते.बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, ङ्गमहाविकास आघाडी म्हणून आम्ही पुणेकरांच्या प्रश्नांसाठी एकत्रितपणे लढणार आहोत. महापालिकेतील विरोधकाची भूमिका अधिक प्रभावी करण्याचा आमचा प्रयत्न असेल.फ काँग्रेसच्या नवनियुक्त शहराध्यक्ष दीप्ती चवधरी यांनीही महाविकास आघाडीतील ऐक्यावर भर दिला. काँग्रेसचे पुणे (पूर्व) शहराध्यक्ष प्रशांत जगताप या बैठकीला अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्कांना उधाण आले होते. मात्र, जगताप यांनी याबाबत स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले, १२ ज्योतिर्लिंग आणि चारधाम यात्रेचे नियोजन तीन महिन्यांपूर्वीच केले होते. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार सध्या धार्मिक यात्रेवर असल्याने बैठकीस उपस्थित राहता आले नाही दरम्यान, बैठकीतील चर्चेनंतर शहरातील विविध प्रलंबित प्रश्नांवर संयुक्तपणे संघर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार १२ जून रोजी



महाविकास आघाडीचे प्रमुख नेते पुणे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांची भेट घेणार आहेत. या बैठकीला खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील, काँग्रेस व राष्ट्रवादीचे नगरसेवक आणि प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार असून, महापालिकेच्या कारभाराविरोधात संयुक्त भूमिका मांडण्यात येणार आहे.

# एसटीला हवे आर्थिक बळ!



खेड्यापाड्यातील धुळीच्या रस्त्यावरून, वळणावळणाच्या घाटातून हॉर्नचा तो ओळखीचा आवाज येतो आणि मनात विश्वास आणि आश्वस्तता दाटून येते. ती येते. गडद लाल पार्श्वभूमीवर पांढऱ्या अक्षरात लिहिलेलं असतं , ङ्गमहाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.फ आपण तिला मायेने म्हणतो- ङ्गआपली एसटीफ किंवा ङ्गलाल परीफ. आज,एक जून रोजी ङ्गएसटीफ्चा ७८वा वर्धापन दिन आहे. हा प्रवास फक्त एका वाहतूकसेवेचा किंवा महामंडळाचा नाही, तर तो महाराष्ट्राच्या जडणघडणीचा, संस्कृतीचा आणि कोट्यवधी मराठी माणसांच्या भावभावनांचा इतिहास आहे. ही एसटी म्हणजे केवळ एक वाहतुकीचे साधन नाही, ते महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचे काळीज आहे. पहाटेच्या पहिल्या गाडीने डोक्यावर भाजीपाल्याची पाटी घेऊन बाजारात जाणारा शेतकरी असो, वा दुधाचे कॅन घेऊन शहरात जाणारा दुधवाला; एसटीने कित्येक संसार उभे केले. अनेक नेतेमंडळी, मोठ्या पदावरचे अधिकारी, बडे व्यावसायिक जेव्हा अभिमानाने सांगतात, ङ्गमी पहिल्यांदा एसटीनेच प्रवास केला. शाळेतही एसटीनेच गेलो, शहरात कॉलेजासाठी गेलो तेव्हा माझे डबे एसटीनेच पोहोचले,फ तेव्हा एसटीचे योगदान अधोरेखित होते. ग्रामीण भागातील लाखो मुलींना शिक्षणाची दारे एसटीच्या मोफत किंवा सवलतीच्या पासनेच खुली करून दिली. दिवाळीचा पाहुणचार असो, लेकीचं माहेरपण असो वा गणपती-बाप्पाच्या दर्शनाची ओढ, एसटीच्या प्रवासाने महाराष्ट्राला एका धाग्यात बांधून ठेवलं आहे. पण काळ बदलला. जागतिकीकरण आले आणि रस्त्यांवर खासगी वाहनांची भाऊगर्दी झाली. प्रवासाचे नवनवीन पर्याय उपलब्ध झाले आणि हळूहळू आपल्या हक्काची एसटी जरा बाजूला पडली! मुळात एसटी ङ्गना नफा ना तोटाफ या उदात्त संकल्पनेवर आणि सूत्रावर सुरू झाली होती. तिचा उद्देश नफा कमविणे नव्हता, तर शेवटच्या माणसापर्यंत सेवा पोहोचवणे हा होता; पण आज परिस्थिती ङ्गबुडत्याचा पाय खोलातफ अशी झाली आहे. आज एसटी महामंडळाला दररोज सुमारे अडीच कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. जाणकारांच्या मते, येत्या १५ जूननंतर जेव्हा उन्हाळी हंगामातील तात्पुरती भाडेवाढ बंद होईल, तेव्हा हा दैनंदिन तोटा थेट किमान पाच कोटी रुपयांवर जाऊन पोहोचेल. आज महामंडळाचा एकूण संचित तोटा १२ हजार कोटी रुपयांच्या पार गेला असून, सुमारे सहा ते सात हजार कोटी रुपयांची वैधानिक देणी रक्कम थकीत आहे. या परिस्थितीत एक मोठी खंत मनाला सलते. महाराष्ट्र सरकार एका बाजूला महावितरणला कर्ज फेडण्यासाठी अर्थसंकल्पात तब्बल ३२ हजार ६७९ कोटी रुपयांची प्रचंड मोठी रक्कम देण्याचा निर्णय घेते; पण दुसऱ्या बाजूला राज्याची जीवनवाहिनी असलेल्या एसटीला मात्र केवळ दर महिन्याला सवलत मूल्य प्रतिपूर्तीची रक्कम दिली जाते. हा निर्णय कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेला छेद देणारा नाही का? एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला वेगळा न्याय असा दुजाभाव न करता गोरगरिबांच्या एसटीलाही अशाच प्रकारे अर्थसाहाय्य दिले पाहिजे. कठीण प्रसंगी एसटीला सुद्धा एकवेळचा पर्याय म्हणून सरकारने भरीव आर्थिक मदत केली, तरच तोट्यातील एसटी वाचू शकेल; अन्यथा हा डोलारा कोणत्याही क्षणी कोलमडून पडेल. सध्या एसटी महामंडळावर असलेल्या थकीत देण्यांचा आकडा अत्यंत धक्कादायक आणि चिंताजनक आहे. यामध्ये प्रामुख्याने भाडे तत्त्वावरील बसची ११० कोटी रुपयांची देणी, ११०० कोटींचा उपदान निधी विश्वस्त मंडळ अंशदान, १४०० कोटींचे भविष्य निर्वाह निधी अंशदान व वर्गणी; तसेच ११५० कोटींचा प्रवासी कर थकीत आहे. याव्यतिरिक्त डिझेलची ११५ कोटींची देणी, ८० कोटींची भांडार खरेदी व पुरवठादार देणी, ६० कोटींची रजा रोखीकरण रक्कम, ३८ कोटींची विमा निगडित वर्गणी, नऊ कोटींचा वैद्यकीय व प्रवास भत्ता आणि ५० लाख रुपयांची अपघात साहाय्यता रक्कम प्रलंबित आहे. त्याहूनही दुर्दैवी बाब म्हणजे, एप्रिल २०१६ पासून कर्मचाऱ्यांचा तब्बल १२०० कोटी रुपयांचा महागाई भत्ता फरक व वाढीव महागाई भत्ता प्रलंबित आहे. वाढीव घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढ फरकाची रक्कम सुद्धा प्रलंबित असून, साधारण सहा ते सात हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त थकीत देणी रक्कम प्रलंबित आहेत. एसटीला तोट्याच्या गर्तेत ढकलण्यात डिझेलच्या सातत्याने वाढणाऱ्या दरांचा मोठा वाटा आहे. मे २०२६ मधील आकडेवारी पाहिली तर समजेल की एसटीच्या खिशाला किती मोठी कात्री लागत आहे. १५ मे २०२६ रोजी महामंडळाचा डिझेलचा सरासरी दर रु. ९१.३१ प्रतिलिटर होता, तो १९ मे रोजी रु. ९२.२६ झाला, २३ मे रोजी रु. ९३.१९ वर पोहोचला आणि २५ मे २०२६ रोजी हा सरासरी दर तब्बल रु. ९६.०० प्रतिलिटर इतका झाला. केवळ १० दिवसांत सरासरी दरात ६.३५ रुपयांची वाढ झाली आहे. मुंबई, नांदेड, कोल्हापूर, नागपूर, अमरावती आणि नाशिक या प्रमुख विभागांमधील आकडेवारी पाहिली तर पूर्वीच्या भाडेवाढीच्या तुलनेत प्रत्यक्षात प्रतिलिटर तब्बल ६.३५ ते ६.३६ रुपयांची वाढ झाली आहे. मुंबईत दर ८८.२१ रुपयांवरून ९४.५७ वर गेला, नांदेडमध्ये ९१.४४ वरून ९७.८ वर तर कोल्हापुरात ८९.१५ रुपयांवरून ९५.५ रुपयांवर गेला. नाशिक, नागपूर आणि अमरावतीमध्येही हीच परिस्थिती आहे. एसटीला डिझेल खरेदी करण्यासाठी वर्षाला सरासरी अंदाजे ३ हजार ४०० कोटी रुपये इतकी रक्कम खर्च होत असून त्यात दरवाढीमुळे दिवसाला सुमारे ७० लाख रुपये इतका खर्च वाढला आहे. गेल्या वर्षी जानेवारीत १५.९५ टक्के व आता या उन्हाळी हंगामात १० टक्के अशी एकूण २५ टक्के भाडेवाढ करूनही डिझेलच्या भडक्यामुळे तसेच नीट व्यवस्थापन व नियोजन नसल्याने एसटीचा तोटा कमी होत नाही. या वर्षीच्या एप्रिल महिन्यात प्रति किलोमीटरला एसटीला ४ रुपये ८० रुपये इतका तोटा झाला असून चक्क ७६ कोटी ४७ लाख रुपये इतका मोठा तोटा सहन करावा लागला आहे. त्यात मे व जून महिन्यात अजून भर पडेल असे दिसत आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कोकण विधान परिषदेसाठी मविआ कडून बाळ माने तर महायुतीकडून तटकरे यांचा अर्ज दाखल

■ रत्नागिरी/वृत्तसंस्था

रत्नागिरी-सिंधुदुर्ग-रायगड कोकण स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद मतदारसंघाच्या निवडणुकीची रंगत दिवसेंदिवस वाढत असून महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात थेट लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. सोमवारी दोन्ही आघाड्यांच्या अधिकृत उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केले. मात्र, भाजपचे आमदार महेंद्र दळवी यांच्या कन्या जुईली दळवी यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. त्यामुळे या निवडणुकीत महायुतीतच अंतर्गत संघर्ष उभा राहिल्याची चर्चा रंगू लागली आहे.

महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा अधिकृत उमेदवार अनिकेत तटकरे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी मनुज जिंदल यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महायुतीच्या प्रमुख नेत्यांनी एकजूट दाखवत मोठी उपस्थिती लावली. मंत्री उदय सामंत, मंत्री नितेश राणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, आमदार दीपक केसरकर यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. महायुतीने ही जागा प्रतिष्ठेची मानून निवडणुकीत पूर्ण ताकद लावण्याचे संकेत या शक्तिप्रदर्शनातून दिले.

दुसरीकडे, महाविकास आघाडीकडून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार बाळ माने यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करताना आमदार भास्कर जाधव, जिल्हाप्रमुख विक्रांत जाधव, मिहीर माने तसेच माधवी माने यांच्यासह आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते. कोकणातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये असलेल्या संपर्काच्या जोरावर ही जागा जिंकण्याचा निर्धार महाविकास आघाडीने व्यक्त केला आहे. मात्र, अधिकृत उमेदवारांच्या अर्जापेक्षा अपक्ष उमेदवारांच्या एन्ट्रीमुळेच राजकीय चर्चांना अधिक वेग आला आहे. जुईली महेंद्र दळवी, ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अरविंद पुंडलिक म्हात्रे आणि अनिल रमेश चोपडा यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी



अर्ज दाखल केले आहेत. त्यामध्ये विशेष लक्ष वेधून घेतले ते जुईली दळवी यांच्या अर्जाने. त्या भाजपचे आमदार महेंद्र दळवी यांच्या कन्या असल्याने त्यांच्या अपक्ष उमेदवारीमागे नेमका काय राजकीय हेतू आहे, याबाबत तर्क-वितर्कांना सुरुवात झाली आहे.

राजकीय जाणकारांच्या मते, जुईली दळवी यांचा अर्ज हा केवळ तांत्रिक किंवा राजकीय दबावतंत्राचा भाग आहे की महायुतीतील काही नाराजीचे संकेत आहेत, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेपर्यंत या चर्चांना आणखी वेग मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कोकण विधान परिषद मतदारसंघ हा पारंपरिकदृष्ट्या राजकीयदृष्ट्या संवेदनशील मानला जातो. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या तीन जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींचे मतदान निर्णायक ठरणार आहे. त्यामुळे प्रत्येक मताला महत्त्व प्राप्त झाले असून महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही बाजूंनी जोरदार राजकीय मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेनंतर आता सर्वांचे लक्ष अर्ज छाननी आणि संभाव्य माघारींकडे लागले आहे. अपक्ष उमेदवार निवडणुकीच्या मैदानात कायम राहतात की राजकीय समीकरणांनुसार माघार घेतात, यावरही निवडणुकीचे चित्र काही प्रमाणात अवलंबून राहणार आहे. कोकण विधान परिषद निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात प्रतिष्ठेची लढत रंगणार असली, तरी जुईली दळवी यांच्या अपक्ष उमेदवारीने या निवडणुकीत उत्सुकता आणि राजकीय गूढता अधिकच वाढवली आहे. आगामी काही दिवसांत घडणाऱ्या राजकीय घडामोडींमुळे कोकणच्या राजकारणात नवे समीकरण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## सावंतवाडी, दोडामार्ग आणि मालवण एसटी डेपो पीपीपी तत्वावर उभारणार : प्रताप सरनाईक

■ सावंतवाडी/वृत्तसंस्था

सावंतवाडी, दोडामार्ग आणि मालवण येथील एसटी बस डेपो खाजगी पीपीपी (सार्वजनिक-खाजगी भागीदारी) तत्वावर विकसित करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला असून, येत्या ऑगस्ट महिन्यात यासाठीच्या निविदा काढण्यात येणार आहेत. तसेच, डिझेल दरवाढीमुळे एसटी महामंडळाला ३१० कोटी रुपयांचा आर्थिक फटका बसत असला, तरी सध्या तरी कोणतीही तिकीट दरवाढ केली जाणार नाही, अशी महत्त्वाची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी येथे दिली. परिवहन मंत्र्यांनी आज सावंतवाडी डेपोला भेट देऊन पाहणी केली, त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

स्थानिक आमदार दीपक केसरकर यांच्या कार्यालयात परिवहन मंत्र्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख संजू परब, सावंतवाडी तालुका प्रमुख नारायण राणे, दिनेश गावडे, दोडामार्ग तालुका प्रमुख व उपसभापती गणेशप्रसाद गवस, सुधा कवठणकर, मायकल डिसोझा,अशोक दळवी, प्रेमानंद देसाई, सभापती सुष्मिता जाधव, सचिन वालावलकर, गोपाळ गवस, राजन रेडकर, क्लेटस फर्नांडिस, गोविंद वाडकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

परिवहन मंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, येत्या १ जूनपासून राज्यातील सर्व एसटी डेपोमधील स्वच्छतागृहे आणि शौचालये प्रवाशांसाठी पूर्णपणे मोफत करण्यात आली आहेत. तसेच सर्व डेपोंमध्ये यांत्रिक पद्धतीने स्वच्छता राखली जाईल आणि तेथे सौर ऊर्जा तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सावंतवाडी एसटी डेपो हा बारामतीच्या धर्तीवर सर्व सुविधायुक्त व आधुनिक 'पोर्ट' प्रमाणे विकसित केला जाईल, ज्यामध्ये सर्वसामान्य प्रवाशांच्या सोयींना प्राधान्य दिले जाईल.

## लाडकी बहीण योजनेतून १.२५ कोटी महिला बाहेर? सुप्रिया सुळेंची उच्चस्तरीय चौकशीची मागणी

■ परभणी/वृत्तसंस्था

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या घटत्या संख्येवरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. सुरुवातीला तब्बल २ कोटी ३८ लाख महिलांना लाभ दिल्याचा दावा करणार्‍या सरकारचे पोर्टल आता केवळ १ कोटी ६ लाख मंजूर अर्ज दाखवत असल्याकडे लक्ष वेधत, सुळे यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी आणि स्वतंत्र ऑडिट करण्याची मागणी केली आहे.



सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' (ट्विटर) वर पोस्ट करत सरकारला काही कडक सवाल विचारले आहेत. डिसेंबर २०२४ पर्यंत २.३८ कोटी महिलांना ₹१७ हजार ५०५ कोटींपेक्षा अधिक रक्कम वितरित झाल्याचा दावा सरकारने केला होता. पुढे ही संख्या २.४८ कोटींवर गेली. e-KYC बंधनकारक केल्यानंतर लाभार्थी संख्या वेगाने घटली. सध्या माध्यमांनुसार सुमारे ८० लाख महिला अपात्र ठरल्या असून १.६६ कोटी महिलांनाच लाभ मिळणार असल्याचे समोर येत आहे. प्रत्यक्ष सरकारी पोर्टलवर एकूण अर्ज फक्त १.१२ कोटी आणि मंजूर अर्ज केवळ १.०६ कोटी दिसत आहेत. याचा अर्थ डिसेंबर २०२४ च्या तुलनेत तब्बल १.२५ कोटींहून अधिक महिला योजनेतून बाहेर पडल्याचे चित्र आहे.

पोर्टलवरील आणि सरकारच्या दाव्यांमधील या मोठ्या तफावतीवर बोट ठेवत सुप्रिया सुळे यांनी सरकारला धारेवर धरले. त्या म्हणाल्या, "हा पैसा जनतेच्या घामाचा आणि कराचा आहे. जर आज पोर्टलवर एवढी कमी संख्या दिसत असेल, तर सुरुवातीचे लाभार्थी नेमके कोण होते? गेली वर्ष-दीड वर्ष सरकार अपात्र लोकांना जनतेचा पैसा वाटत होते का?" हा प्रकार म्हणजे सरकारचे घोर अपयश असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रातील प्रत्येक पात्र भगिनीला या योजनेचा लाभ नियमितपणे मिळालाच पाहिजे, अशी ठाम भूमिका सुप्रिया सुळे यांनी मांडली आहे. आता यावर सरकार काय स्पष्टीकरण देते, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## लाडकी बहीण योजनेतून ८० लाख महिला अपात्र? तटकरेंनी अखेर मौन सोडले

■ मुंबई/वृत्तसंस्था

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांची ई-केवायसी झाल्यानंतर जवळपास ८१ लाख महिलांना अपात्र ठरवण्यात आलं आहे. ई-केवायसीनंतर या योजनेत १ कोटी ६६ लाख बहिणी अनुदानासाठी पात्र ठरल्या आहेत. यावरून राज्यात गदारोळ निर्माण झाला आहे. दरम्यान, यावरून महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अनिकेत तटकरे यांनी विधान परिषद निवडणुकीचा अर्ज भरल्यानंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या.

आदिती तटकरे यांना आज मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून ८१ लाख अर्ज बाद झाल्याबाबत विचारण्यात आलं. त्या म्हणाल्या,



अर्ज बाद झालेले नाहीत. याजनेसाठी ई-केवायसीची प्रक्रिया गेल्यावर्षी ऑगस्टपासून सुरू झाली. केवायसी पूर्ण करण्याकरता सुरुवातीला तीन महिन्याचा कालावधी दिला. त्यानंतर दोनवेळा मुदतवाढ देण्यात आली. त्यामुळे एकूण आठ-दहा महिन्यांची वाढ झाली होती."

"ई केवायसी फक्त लाडकी बहीण योजनेत नाहीय. तर, राज्याच्या ज्या ज्या डीबीटी योजना आहेत, त्या सर्वांना ई केवायसीची प्रक्रिया केली जाते. ८१ लाख आकड्यात फक्त ई-केवायसीच्या महिला नाहीत. तर, मुदतीत ई केवायसी न केलेल्या महिलाही आहेत. तसंच, गेल्या दहा महिन्यांपासून आयकर विभागाकडून डेटा मागवलेला होता. ज्यांचं उत्पन्न २ लाखांपेक्षा जास्त आहे, अशा जवळपास १२ लाख महिलांचाही या ८१ लाख अपात्र महिलांमध्ये समावेश आहे. तर, ६५ वर्षांवरील साडेचार लाख महिलांचा समावेश आहे. १४ हजार महिला या सरकारी कर्मचारी होत्या, त्यामुळे त्यांनाही वगळण्यात आलं आहे", असं आदिती तटकरे म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या, ई-केवायसी करूनही ज्या महिलांना लाभ मिळणे झाला आहे, त्यांची फेरतपासणी करण्यात येणार आहे. कारण, कोणीही पात्र महिला लाभापासून वंचित राहता कामा नये. या छाननीमधून संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांनाही वगळण्यात आलं आहे. कारण, दोन्हीपैकी एकाच शासकीय योजनांचा लाभ मिळणार आहे. तर, ज्यांच्या नावावर वाहन आहे, त्यांनाही या योजनेतून वगळलं आहे. पण त्यातीलही काही लाभार्थ्यांनी वाहन नसल्याची तक्रार केली आहे. त्यामुळे त्यांचीही फेरतपासणी होणार आहे."

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर अपघात, 2 जणांचा मृत्यू

**मुंबई/वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात गेल्या 24 तासांत घडलेल्या दोन भीषण अपघातांनी राज्य हादरले आहे. एका बाजूला मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर कंटेनर आणि ट्रकच्या भीषण धडकेत दोन जणांचा मृत्यू झाला, तर दुसऱ्या बाजूला अंबरनाथमध्ये भरधाव कारने रस्त्यावर अक्षरशः धुमाकूळ घालत अनेकांना जखमी केले. दोन्ही घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर आज पहाटे साडेचारच्या सुमारास खोपोली परिसरात भीषण अपघात घडला. पुण्याकडून मुंबईच्या दिशेने तेलाचे डबे वाहून नेणारा कंटेनर अचानक चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्यावर उलटला. यामुळे महामार्गावर काही क्षणांतच गंभीर परिस्थिती निर्माण झाली. कंटेनर उलटल्यानंतर मागून भरधाव वेगाने येणाऱ्या तांदूळ वाहतूक करणाऱ्या ट्रक चालकाला वाहनावर नियंत्रण ठेवता आले नाही. परिणामी ट्रक थेट उलटलेल्या कंटेनरवर जाऊन आदळला. धडक इतकी जोरदार होती की ट्रकचा पुढील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. या भीषण अपघातात ट्रक चालक



आणि क्लिनर यांचा जागीच मृत्यू झाला. बचाव पथकाने मोठ्या प्रयत्नांनंतर दोघांचे मृतदेह बाहेर काढले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

या दोन अवजड वाहनांच्या अपघातात बाजूने प्रवास करणारी एक अर्टिगा कारदेखील अडकली. कारमधील 80 वर्षीय वृद्ध महिला गंभीर जखमी झाली असून त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू असून प्रकृतीबाबत डॉक्टरांकडून विशेष लक्ष ठेवले जात आहे. अपघातानंतर मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक जवळपास दोन तास ठप्प झाली होती. महामार्ग पोलीस, आपत्कालीन पथक आणि क्रेनच्या मदतीने अपघातग्रस्त वाहने हटवण्यात आली. त्यानंतर वाहतूक हळूहळू पूर्ववत करण्यात आली.

दरम्यान, ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ-उल्हासनगर मार्गावर घडलेल्या दुसऱ्या घटनेने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मध्यरात्री एका भरधाव स्विफ्ट डिझायर कारने रस्त्यावरून जाताना पादचारी आणि इतर वाहनांना धडक देत धुमाकूळ घातला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, कारचा वेग अत्यंत जास्त होता. अनेकांना धडक देत वाहन पुढे जात राहिल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. या घटनेत अनेक जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर संतप्त नागरिकांनी फॉलोवर लाईन चौक परिसरात कारला घेराव घातला. रागाच्या भरात काहींनी वाहनाची तोडफोड केली. कारच्या काचा फोडण्यात आल्या असून वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र, घटनास्थळी निर्माण झालेल्या गोंधळाचा फायदा घेत कार चालक वाहन सोडून फरार झाला. त्यामुळे नागरिकांचा संताप आणखी वाढला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये संपूर्ण घटना कैद झाली असून पोलिसांनी फुटेज जप्त केले आहे.

## भर रस्त्यात व्यावसायिकाच्या मुलाची गोळ्या झाडून हत्या; धक्कादायक कारण समोर

**मुंबई/वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशच्या गाझीपूर शहरातील सदर कोतवाली परिसरातील बिंदू हॉटेलमध्ये शुक्रवारी रात्री धक्कादायक घटना घडली. प्रसिद्ध हॉटेल व्यावसायिक आलोक राय यांचा मुलगा विनीत राय याची चार हल्लेखोरांनी गोळ्या झाडून हत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विनीत राय शुक्रवारी रात्री हॉटेलमध्ये कामकाज पाहून घरी जाण्यासाठी निघाला होता. हॉटेलजवळ हल्लेखोर आधीच दबा धरून बसले होते.हल्लेखोरांनी आधी हॉटेलच्या सुरक्षारक्षकाकडे बिअर खरेदी करण्याच्या बहाण्याने विनीतची चौकशी केली आणि पेमेंट करण्याच्या बहाण्याने काही वेळ तिथेच घालवला. रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास विनीत हॉटेलच्या गेटजवळ आपल्या कारकडे जात असताना दोन मोटरसायकलवरून आलेल्या चार हल्लेखोरांनी त्याला घेरले.

विनीत हॉटेलमधून बाहेर आला. त्याला पाहताच आरोपींनी कमरेतून पिस्तूल काढले आणि त्याच्यावर गोळीबार सुरू केला. विनीतच्या हाताला आणि कमरेला प्रत्येकी एक गोळी लागली, तर छातीत दोन गोळ्या झाडण्यात आल्या. जीव वाचवण्यासाठी तो पळण्याचा प्रयत्न करत असताना हल्लेखोरांनी त्याचा पाठलाग करून गोळीबार केला. गंभीर जखमी झालेला विनीत जागीच कोसळला. हल्लेखोरांनी सुरक्षारक्षकावरही हल्ल्याचा प्रयत्न केला, मात्र तो हॉटेलमध्ये पळून गेल्याने बचावला. त्यानंतर आरोपींनी हवेत गोळीबार करत घटनास्थळावरून पलायन केले. माहिती मिळताच आलोक राय आणि त्यांच्या कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या विनीतला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

## पत्नीला ४ तास 'कोंबडा' बनवून अमानुष मारहाण

**मुंबई/वृत्तसंस्था**

मुंबईतील चेंबूर परिसरातून कौटुंबिक हिंसेची आणि गुन्हेगारीची एक अत्यंत धक्कादायक, थरकाप उडवणारी घटना समोर आली आहे. आरसीएफ-चेंबूर भागात एका तडीपार गुंडाने आपल्या 25 वर्षीय पत्नीला घरात डांबून ठेवत तब्बल चार तास 'कोंबडा' बनवून अमानुष छळ केला. इतकेच नव्हे तर पट्ट्याने मारहाण करत, तिच्यावर तलवार आणि ॲसिड फेकण्याची धमकी दिली.




या छळातून सुटका करून घेऊन पीडिता जेव्हा आपल्या माहेरी पोहोचली, तेव्हा आरोपीने तिथेही जाऊन पत्नीसह तिचे वडील आणि भावावर चाकूने जीवघेणा हल्ला केला. या प्रकरणी आरसीएफ पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. अरबाज अनवर अली सय्यद (वय 25) असे या विकृत आणि सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार 25 वर्षीय महिला वाशीनाका परिसरातील रहिवासी आहे. तिचा पती अरबाज सय्यद हा एक अट्टल गुन्हेगार आहे. त्याच्या गंभीर गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे मुंबई पोलिसांनी त्याला डिसेंबर 2025 मध्ये तडीपार केले होते. असे असतानाही तो आदेशाचे उल्लंघन करून बकरी ईदच्या दिवशी चेंबूर भागात आला. त्याने कपडे आणि इत्र खरेदी करण्याच्या बहाण्याने पत्नीला विजय नगर भागात बोलावून घेतले. तिथे पोहोचताच अरबाजने पत्नीसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. त्याने तिला बेदम मारहाण करत घरात डांबले. पट्ट्याने जबर मारहाण केल्यानंतर, त्याने पीडितेला सलग चार तास 'कोंबडा' बनवून ठेवले. तसेच तिला तलवारीने कापून टाकण्याची आणि तोंडावर ॲसिड फेकण्याची धमकी दिली. या अमानुष त्रासाला सहन करत, रात्री 9 च्या सुमारास पीडितेने कशीबशी स्वतःची सुटका केली आणि ती थेट आपल्या वडिलांच्या घरी पोहोचली. पत्नी माहेरी पळून गेल्याचे समजताच आरोपी अरबाजचा राग अनावर झाला. तो काही वेळातच तिच्या माहेरी पोहोचला आणि तिच्या वडिलांशी, भावाशी हुज्जत घालू लागला. भांडणाचा आवाज ऐकून पीडितेची बहीण मध्यस्थी करायला आली असता, आरोपीने तिलाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर आरोपीने जवळ असलेला चाकू काढून पत्नीवर थेट वार केला. स्वतःचा बचाव करण्यासाठी पीडितेने हात पुढे केला, ज्यामुळे तिच्या हाताला गंभीर दुखापत झाली. यादरम्यान आरोपीने हवेत चाकू फिरवून परिसरात दहशत निर्माण केली आणि मध्यस्थी करणाऱ्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर पीडितेच्या भावाने तिला उपचारासाठी तात्काळ शताब्दी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.


## सोशल मीडिया इन्फ्लुएंसरचा संशयास्पद मृत्यू, ६ जणांविरोधात गुन्हा दाखल

**लखनौ/वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ येथील सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असलेल्या मानसीचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला आहे. ही घटना सादातगंज परिसरात घडली आहे. या नवविवाहित महिलेचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर महिलेच्या कुटुंबीयांनी सासरकडच्या लोकांवर हुंड्याचा आरोप केला आहे. हुंड्यापायी मुलीची हत्या केल्याचा आरोप त्यांनी केला असून मृत मानसीचा पती आणि सासरच्या मंडळींवर गंभीर आरोप केले आहेत.

कानपूरच्या टीपी नगर बागाही येथील रहिवासी सुनील कुमार वर्मा यांनी ९ डिसेंबर २०२४ रोजी त्यांची भाची मानसी हिचा विवाह लखनौच्या सादातगंज येथील रहिवासी सागर राजपूत याच्याशी लावला. सागर राजपूत हा एक सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर आहे. इंस्टाग्रामवर त्याचे अंदाजे ७.९३ लाख फॉलोअर्स आहेत. मृत मानसीसुद्धा सोशल मीडियावर सक्रिय होती.

कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी लग्नात सागरला सुमारे ७ लाख रुपये रोख, आणि इतर घरगुती वस्तू दिल्या आहेत. पण सासरचे लोक त्यावर खूश नव्हते. मानसीच्या आईवडिलांनी आरोप केला की, लग्नात कमी हुंडा दिल्याबद्दल तिला हिणवले जात होतं. तिचा नवरा सागर, सासरे राजेश, दीर अनु, नणंदा बरखा आणि चांदनी, आणि वहिनी आशा यांनी अतिरिक्त हुंडा म्हणून सतत कारची मागणी केली होती. मानसीच्या घरच्यांनी कार दिली नाही तेव्हा तिला शारीरिक आणि मानसिक छळाला सामोरे जावे लागले. मयत महिलेने आपल्या कुटुंबीयांना होणाऱ्या छळाबद्दल वारंवार फोन करून सांगितले होते. तडजोड घडवून आणण्यासाठी कुटुंबीय अनेक वेळा लखनौला आले होते, पण छळ सतत सुरूच राहिले. शनिवारच्या दिवशी नातेवाईकांनी कुटुंबाला कळवले की त्यांच्या मुलीने गळफास घेतला आहे. मात्र, तिच्या आईवडिलांचा आरोप केला की, हुंड्याची मागणी पूर्ण न झाल्यामुळे तिच्या सासरच्या मंडळींनी आधी तिचा खून केला आणि नंतर ती आत्महत्या वाटावी म्हणून तिचा मृतदेह लटकवला.





# हॉटेलकडे परतत असताना गुजरात टायटन्सच्या बसला आग; जीवितहानी नाही

■ अहमदाबाद/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्यात पराभवाचा धक्का बसल्यानंतर काही तासांतच गुजरात टायटन्सच्या संघावर आणखी एक संकट कोसळले. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून अंतिम फेरीत पराभव स्वीकारल्यानंतर संघ हॉटेलकडे परतत असताना त्यांच्या बसला अचानक आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेचा ३७ सेकंदांचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून त्यामध्ये खेळाडू जीव वाचवण्यासाठी बसमधून बाहेर पडताना आणि रस्त्याच्या कडेला धावताना दिसत आहेत. या घटनेमुळे काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, सुदैवाने सर्व खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला वेळेत बसमधून बाहेर काढण्यात आल्याने मोठी दुर्घटना टळली.

रविवारी रात्री नरेंद्र मोदी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू कडून अंतिम सामन्यात पराभव झाल्यानंतर गुजरात टायटन्सचा संघ हॉटेलकडे रवाना झाला होता. मात्र, प्रवासादरम्यान बसमध्ये अचानक शॉर्ट सर्किट झाले आणि काही क्षणांतच धुराचे लोट बाहेर येऊ लागले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत चालकाने तातडीने बस थांबवली. बस थांबताच खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला त्वरित खाली उतरवण्यात आले. काही खेळाडू रस्त्याच्या कडेला उभे राहिले, तर काहींनी सुरक्षिततेसाठी झाडाझुडपांच्या दिशेने फिरताना व्हिडीओमध्ये दिसते. काही क्षणांसाठी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने सर्वांना वेळेत बाहेर काढण्यात आल्याने मोठी दुर्घटना टळली.

आग लागल्यानंतर संघातील सदस्यांना जवळपास एक तास रस्त्यावरच थांबावे लागले. त्यानंतर प्रशासन आणि संघ व्यवस्थापनाने पर्यायी वाहनांची व्यवस्था केली. सर्व खेळाडूंना आणि स्टाफ सदस्यांना सुरक्षितपणे हॉटेलमध्ये पोहोचवण्यात आले. गुजरात टायटन्ससाठी ही रात्र अत्यंत वेदनादायी ठरली. एका बाजूला आयपीएल ट्रॉफी जिंकण्याचे स्वप्न भंगले, तर दुसऱ्या बाजूला बसला आग लागल्याने संघाच्या अडचणींमध्ये भर पडली.






## आयपीएलच्या एकाच सीजनमध्ये वैभवला पाच पुरस्कार

■ पटना/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ मध्ये वैभव सूर्यवंशीची टीम राजस्थान रॉयल्स जरी फायनलमधून बाहेर पडली होती, तरीही वैभवने विक्रम केला आहे. आयपीएल फायनलमध्ये १५ वर्षांच्या वैभवने ५ पुरस्कार आपल्या नावावर केले आहेत. सर्वाधिक धावा काढल्याबद्दल वैभवला ऑरेंज कॅपसोबत इमर्जिंग प्लेयर ऑफ द सीजन, मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर, सुपर स्ट्रायकर ऑफ द सीजन आणि मोस्ट सिक्सेसचा किताबही मिळाला आहे. या पुरस्कारांद्वारे त्याने एकूण ४५ लाख रुपयांची बक्षीस रक्कम मिळवली, तर सुपर स्ट्रायकर ऑफ द सीजन बनल्याबद्दल त्याला टाटा सिएरा कारही बक्षीस म्हणून मिळाली.



वैभवला ऑरेंज कॅप मिळाली आहे. तो ऑरेंज कॅप जिंकणारा सर्वात तरुण खेळाडू बनला आहे. त्याने अवघ्या १५ वर्षे आणि ६५ दिवसांच्या वयात ही कामगिरी आपल्या नावावर केली आहे. १६ सामन्यांमध्ये त्याने ७७६ धावा केल्या आहेत, ज्या या हंगामात कोणत्याही फलंदाजाने केलेल्या सर्वाधिक धावा आहेत. यादरम्यान त्याने एक शतक आणि ५ अर्धशतके देखील आपल्या नावावर केली आहेत. वैभवने साई सुदर्शनचा विक्रम मोडला आहे. साई सुदर्शन आयपीएल २०२५ मध्ये ऑरेंज कॅप जिंकणारा सर्वात तरुण खेळाडू बनला होता. त्याने ही कामगिरी २३ वर्षे २३७ दिवसांच्या वयात केली होती. वैभवने या हंगामात सर्वाधिक २३७.३० च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या आणि 'सुपर स्ट्रायकर ऑफ द सीझन'चा पुरस्कार पटकावला. आयपीएलच्या इतिहासात इतक्या स्ट्राइक रेटने कोणत्याही खेळाडूने ७०० किंवा त्याहून अधिक धावा केल्या नाहीत. दुसरीकडे, सूर्यवंशीने या हंगामात विक्रमी ७२ षटकार मारले. तो एका आयपीएल हंगामात सर्वाधिक षटकार मारणारा खेळाडू ठरला. यापूर्वी हा विक्रम ख्रिस गेलच्या नावावर होता, ज्याने ५९ षटकार मारले होते. या हंगामात दमदार कामगिरी करणाऱ्या सूर्यवंशीला 'इमर्जिंग प्लेयर ऑफ द सीझन' म्हणूनही निवडण्यात आले आहे.

## डिके शिवकुमार यांची आयपीएलच्या आयोजकांवर नाराजी

■ अहमदाबाद/वृत्तसंस्था

नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्समध्ये आयपीएल २०२६ चा अंतिम सामना पार पडला. या सामन्यात आरसीबीने आयपीएल ट्रॉफीवर सलग दुसऱ्यांदा आपले नाव कोरले आहे. आरसीबीचे चाहते आनंद साजरा करत असताना कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डिके शिवकुमार यांनी मात्र आपली नाराजी जाहीरपणे व्यक्त केली आहे.



आरसीबीने अंतिम सामन्यात गुजरात टायटन्सकहा ५ विकेट्सने पराभव केला आहे. विराट कोहलीच्या नॉट आउट ७५ रन्सच्या खेळीमुळे आरसीबीने आयपीएल ट्रॉफी जिंकली आहे. या विजयानंतर कर्नाटकसह संपूर्ण देशातील आरसीबी चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण असतानाच डी.के. शिवकुमार यांनी आयोजकांवर नाराजी व्यक्त केली आहे. आयपीएलचा अंतिम सामना बंगळुरूमध्ये होणे अपेक्षित होते. परंतु राजकारणामुळे हा सामना गुजरातला हलवण्यात आला. आमच्यावर अन्याय झाला आहे, असे खळबळजनक विधान डिके शिवकुमार यांनी केले. डिके शिवकुमार यांनी नाराजी व्यक्त केली असली तरी देखील आरसीबीच्या विजयावर आनंद देखील व्यक्त केला आहे. यांच्या मुलांनी इतिहास रचला आहे. त्यांनी कर्नाटकची मान अभिमानाने उंचावली आहे, असे कौतुक त्यांनी केले आहे.

# झी एंटरटेनमेंटने मिळवले फिफा विश्वचषक २०२६ प्रक्षेपण हक्क

## आगामी आठ वर्षांसाठी ऐतिहासिक करार; स्पर्धेला अवघे १० दिवस शिल्लक

■ मुंबई/वृत्तसंस्था

गेल्या अनेक महिन्यांपासून भारतात फिफा विश्वचषकाचे प्रक्षेपण कुठे होणार, याबाबत असलेली मोठी अनिश्चितता सोमवारी संपली. झी एंटरटेनमेंटने २०२६ च्या फिफा विश्वचषकासह आगामी २०३४ पर्यंतच्या अनेक फिफा स्पर्धांचे प्रसारण हक्क भारतात सुरक्षित केले आहेत. हा महत्त्वपूर्ण करार अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको येथे ११ जून रोजी सुरू होणाऱ्या विश्वचषकाच्या अवघ्या १० दिवसांपूर्वी झाला आहे.

फुटबॉलच्या या महाकुंभासाठी भारत हा जगातील अशा मोजक्या मोठ्या बाजारपेठांपैकी एक होता, जिथे प्रक्षेपणाचे हक्क अद्याप निश्चित झाले नव्हते. फिफा आणि विविध भारतीय प्रसारकांमध्ये प्रदीर्घ काळ चाललेल्या वाटाघाटींनंतर अखेर झी समूहाने यावर शिक्कामोर्तब केले. या करारानुसार, झी समूहाला आगामी ८ वर्षांत म्हणजेच २०३४ पर्यंत फिफा



विश्वचषकासह इतर ३८ फिफा स्पर्धांचे थेट प्रक्षेपण करण्याचे दीर्घकालीन हक्क मिळाले आहेत.

या कराराचा नेमका आर्थिक तपशील अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. मात्र फिफाने २०२६ आणि २०३० च्या विश्वचषकाचा समावेश असलेल्या भारतीय पॅकेजसाठी सुरुवातीला सुमारे १०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची मागणी केली होती. नंतर ही किंमत कमी करून ती ६० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स करण्यात आली होती.

भारतातील अग्रगण्य क्रीडा प्रसारक आणि रिलायन्स-डिस्नीची संयुक्त कंपनी असलेल्या 'जिओस्टार'ने यासाठी २० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची बोली लावली होती. मात्र, फिफाने ही बोली फेटाळून लावली. यापूर्वी २०१४ आणि २०१८ चे विश्वचषक प्रसारित करणाऱ्या 'सोनी' समूहानेही या पॅकेजबाबत चर्चा केली होती, परंतु त्यांनी अंतिम बोली लावली नाही.

### पहिलावहिला ४८-संघांचा विश्वचषक

■ या नवीन करारामुळे भारतातील फुटबॉल चाहत्यांना इतिहासातील सर्वात मोठ्या आणि पहिल्यांदाच ४८ संघांचा सहभाग असलेल्या फिफा विश्वचषकाचा आनंद घेता येणार आहे. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये संयुक्तपणे आयोजित होणारी ही स्पर्धा फुटबॉल इतिहासातील आजवरची सर्वात मोठी स्पर्धा मानली जात आहे.

### झी एंटरटेनमेंटच्या शेअरमध्ये ६.४ टक्क्यांची उसळी

■ झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेस लिमिटेडने क्रीडा प्रक्षेपणाच्या व्यवसायात मोठी झेप घेतली आहे. ही त्यांच्या क्रीडा विभागातील आतापर्यंतची सर्वात मोठी वाढ आहे. या करारामुळे गुंतवणूकदारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, सोमवारी दुपारी झी एंटरटेनमेंटच्या शेअरमध्ये ६.४ टक्क्यांची जोरदार उसळी पाहायला मिळाली आणि आता कंपनीचा शेअर ९८.५१ रुपयांवर व्यवहार करत आहे.

# कलाकारांना एकत्र पाहून मी भारावून गेलो

## सिद्धार्थने सांगितला रणवीर-दीपिकाच्या रिसेप्शन मधला अनुभव..

अभिनेता सिद्धार्थ जाधवने मराठीसह हिंदीतही अनेक लोकप्रिय चित्रपटांमध्ये वेब सिरीजमध्ये काम केले आहे. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या 'मटका किंग' या वेब सिरीजमधील त्याच्या अभिनयाचे सगळीकडे कौतुक झाले. रणवीर सिंहची एनर्जी मॅच करणारा मराठीतला हा एकमेव असेल. दोघांनी सिंबा चित्रपटात एकत्र काम केल्यापासून सिद्धार्थ आणि रणवीर सिंह यांची चांगली मैत्री झाली. रणवीरने सिद्धार्थला आणि त्याच्या पत्नीला त्याच्या लग्नाच्या रिसेप्शन पार्टीलाही बोलावले होते. अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत सिद्धार्थ जाधवने रणवीरच्या रिसेप्शन पार्टीतील एक अनुभव सांगितला. रिसेप्शनला गेल्यानंतर दहाव्या मिनिटाला या पार्टीतून पत्नीला घेऊन निघून गेल्याचे त्याने सांगितले. पण त्याने असे का केले? याचे उत्तरही सिद्धार्थने या मुलाखतीत दिले आहे.

सिद्धार्थ म्हणाला, 'रणवीर सरांच्या लग्नाच्या रिसेप्शनला गेलो होतो त्यावेळी मी 'स्टार स्टक' झालो होतो. त्या रिसेप्शन पार्टीला सचिन तेंडुलकर सर, अमिताभ बच्चन सर, विकी कौशल सर असे सगळे स्टार्स होते. मी माझ्या पत्नीसोबत पार्टीला गेलो होतो. पार्टीत गेल्यावर तृप्तीला उद्या दहाव्या मिनिटाला म्हणालो 'चल आपण जाऊयात' मग तिनेच मला थांबवले. सगळ्या कलाकारांना एकत्र पाहून मी पूर्णपणे भारावून गेलो होतो. पहिल्यांदाच अशा मोठ्या पार्टीत मी गेलो होतो' 'त्यानंतर आम्ही दोघे रणवीर सर आणि दीपिका मॅमला जाऊन भेटलो आणि मी लगेच पार्टीतून निघालो. एवढ्या मोठ्या कलाकारांना पहिल्यांदाच एकत्र पाहून मी भारावून गेलो होतो. आजवर या सगळ्यांना मी फक्त पडद्यावर पाहिले होते. त्यामुळे यांना प्रत्यक्ष पाहायला मिळेल असे कधी वाटले नव्हते.' असे सिद्धार्थने सांगितले. रणवीर आणि सिद्धार्थची ओळख 'सिंबा' चित्रपटाच्या निमित्ताने झाली होती. तो म्हणाला, 'आमची मैत्री झाली ती रोहित शेट्टीमुळे. सिंबा चित्रपटाच्या शूटिंगसाठी आम्ही एकत्र विमानाने प्रवास करत होतो तेव्हा आम्ही पहिल्यांदा भेटलो. त्यानंतर चित्रीकरणादरम्यान आमच्यात छान मैत्री निर्माण झाली."



## 'मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले' मालिका घेणार प्रेक्षकांचा निरोप

टीआरपीच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी स्टार प्रवाहने अलीकडेच नव्या कोऱ्या ८ मालिकांची घोषणा केली आहे. नव्या मालिकांच्या सपाट्यात मात्र, डॉ अमोल कोल्हे आणि अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर यांच्या प्रमुख भूमिका असलेली 'मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले' ही मालिका आता अवघ्या १५२ भागांमध्येच प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. ही मालिका सुरू होऊन पाचच महिने झाले होते. १४ जूनला ही मालिका बंद होईल असे अभिनेते डॉ अमोल कोल्हे यांनी सांगितले.

'मालिका अवघ्या १५२ भागांमध्ये संपते हे दुर्दैव आहे, पण मालिकेची गोष्ट थांबणार नाही. एका वेगळ्या मंचावर ही गोष्ट प्रेक्षकांना पाहायला मिळेल' असे त्यांनी म्हटले. गेल्या काही दिवसांपासून 'मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले' मालिका संपण्याविषयीच्या चर्चा सुरू होत्या. अखेर १५२ भागांमध्ये ही मालिका प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. या मालिकेच्या जागी 'सुना येती घरा' ही मालिका सुरू होणार आहे.

यावर अभिनेते डॉ अमोल कोल्हे म्हणाले 'शिक्षण हेच खरे सामर्थ्य' हा विचार



रुजवण्यासाठी सावित्रीबाई फुले आणि ज्योतीराव फुले यांनी बराच संघर्ष केला. 'मी सावित्रीबाई जोतिराव फुले' या मालिकेतून प्रेक्षकांनी या मालिकेतील त्यांचा प्रवास पाहिला आहे. मात्र खऱ्या अर्थाने जिथे त्यांची गोष्ट सुरू होते त्याच टप्प्यावर मालिका प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. ही मालिका संपणार असली तरी ही गोष्ट वेगळ्या व्यासपीठावर नव्या रूपात प्रेक्षकांच्या भेटीला येईल .एकीकडे आपण महात्मा फुले यांचा जन्मशताब्दी वर्ष साजरा करतोय. पण १५२ भागांमध्येच मालिका संपते हे दुर्दैव आहे." असे अमोल कोल्हे म्हणाले.

## देऊळबंद २ ने कमवला ५० कोटींचा गल्ला

प्रवीण तरडेंचा 'देऊळ बंद 2' चित्रपट सध्या जगभरात धुमाकूळ घालत आहे. चित्रपटाने ५० कोटींचा टप्पा पार केला आहे. चित्रपटातील डायलॉग, संवाद, गाणी, अभिनय आणि चित्रपट थेट प्रेक्षकांच्या काळजाला भिडले. चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशींनी साकारलेली स्वामींची भूमिका चाहत्यांना आपलीशी वाटली. 'देऊळ बंद २'मध्ये शेतकरी महिला स्वामींची परीक्षा घेताना दिसत आहे. त्यामुळे चित्रपटाची टॅग लाइन 'देऊळ बंद २- आता परीक्षा देवाची' अशी आहे. १२ व्या दिवशी म्हणजे दुसऱ्या सोमवारी प्रवीण तरडेंच्या 'देऊळ बंद २' चित्रपटाने १,९८१ शोजमधून ₹२.६० कोटींचे नेट कमाई केली आहे. यामुळे आतापर्यंतचे भारतातील एकूण ग्रॉस कमाई ५४.८८ कोटी रुपयांवर पोहचली आहे. तर एकूण नेट कमाईने ४६.६५ कोटी रुपये कमावले आहे. 'देऊळ बंद २' चित्रपटातील 'देशात सगळं ओरिजनल, डुप्लिकेट फक्त शेतकरी...', '१० दिवसांत एक जरी आत्महत्या झाली तर माझं देऊळ बंद!', 'मी तुमचं अस्तित्व मान्य करेन पण, तुम्ही आधी परीक्षा द्या...' ही डायलॉग खूप गाजत आहे. चित्रपटात स्वामी शेतकरी महिलेसोबत प्रवास करताना, तिच्याशी बोलताना , शेतात, दऱ्याखोऱ्यांमध्ये, एसटीने फिरताना दिसत आहेत.

## 'ऊंचा लंबा कद' च्या नवीन व्हर्जनचा धुमाकूळ

बॉलिवूडचा लोकप्रिय कॉमेडी चित्रपट 'वेलकम' पुन्हा एकदा चर्चेत आहे. 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटातील 'ऊंचा लंबा कद' हे नवीन गाणे प्रदर्शित झाले आहे. हे गाणे २००७ च्या सुपरहिट चित्रपट 'वेलकम'मधील प्रसिद्ध गाण्याची पुनर्रचित आवृत्ती आहे. यापूर्वी या गाण्यात अक्षय कुमार आणि कतरिना कैफ दिसले होते, पण यावेळी अक्षयसोबत दिशा पटानी दिसत आहे. चित्रपटाच्या प्रमोशनल व्हिडिओमध्ये अक्षय कुमार आणि दिशा पटानी या लोकप्रिय गाण्याच्या नव्या व्हर्जनवर नाचताना दिसत आहेत. हा व्हिडिओ 'वेलकम' चित्रपटाच्या आठवणी जागवतो, तसेच चित्रपटातील विनोद आणि गंमतीची झलकही दाखवतो. चाहत्यांना २००७ सालच्या चित्रपटाची आठवण येते.

सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर करताना अक्षय कुमारने लिहिले की, १८ वर्षांनंतरही हे गाणे सर्वांचे आवडते आहे. दिशा पटानीसोबतचा हा नवीन प्रवास शेअर करताना त्याने कतरिना कैफची आठवणही काढली. अक्षयने पोस्टमध्ये लिहिले की, तो त्याची 'क्वीन कतरिनाला' कधीही विसरणार नाही. या खास संदेशाने चाहत्यांचेही लक्ष



वेधून घेतले. दिग्दर्शक अनीस बाझमी यांचा 'वेलकम' हा चित्रपट सर्वप्रथम २००७ मध्ये प्रदर्शित झाला आणि त्याला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रशंसा मिळाली. त्यानंतर २०१५ मध्ये 'वेलकम बॅक' प्रदर्शित झाला. आपल्या उत्साही विनोदी पात्रांमुळे, मार्मिक संवादांमुळे आणि अनोख्या कथानकामुळे ही फ्रँचायझी बॉलिवूडमधील सर्वात लोकप्रिय विनोदी मालिकांपैकी एक बनली आहे.

'वेलकम टू द जंगल'मधून प्रेक्षकांना एका परिपूर्ण मनोरंजनाचा अनुभव मिळेल. नवीन पात्रे, उत्कंठावर्धक विनोद आणि थोडी ॲक्शन असलेला हा चित्रपट, पुन्हा एकदा हास्य आणि मनोरंजनाचे एक संपूर्ण पॅकेज देण्यास सज्ज आहे.

## कॉमेडी किंग भाऊ कदम यांच्यासोबत झळकणार गौतमी पाटील




अदा आणि लावणीतून प्रेक्षकांना घायाळ करणारी सबसे कातिल गौतमी पाटिलचा चाहतावर्ग खूप मोठा आहे. ती बऱ्याचदा कोणत्या न कोणत्या कारणामुळे चर्चेत असते. तिचे अनेक साँग अल्बम व्हायरल होतात. आपल्या आगामी प्रोजेक्ट्सबाबत अपडेट्स ती सोशल मीडियावर शेअर करत असते. अलिकडेच गौतमी पाटीलने आपल्या आगामी प्रोजेक्टची माहिती दिली आहे. गौतमी आता लवकरच प्रसिद्ध मराठी अभिनेते आणि कॉमेडी किंग भाऊ कदम यांच्यासोबत एका गाण्यात झळकणार आहे.

या गाण्यातील फर्स्ट लूक तिनं इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. 'हिल पोरी हिला' असे गाण्याचे बोल असून, हे गाणे ५ जून रोजी रिलीज होणार आहे. भाऊ कदम यांनी दादा कोंडके यांचा लूक कॅरी केला आहे. तर, गौतमी पाटीलने नऊवारी साडी नेसली आहे. दरम्यान, या गाण्यातून पहिल्यांदाच गौतमी पाटील आणि भाऊ कदम ही नवी कोरी जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

गौतमी पाटीलने या गाण्याचा फर्स्ट लूक शेअर केला आहे. पोस्ट शेअर करत तिने, 'दादांचे सुपरहिट गाणे "हिल पोरी हिला" एका नव्या ढंगात...ज्यांची मी खूप मोठी चाहती आहे, अशा महाराष्ट्राचे लाडके भाऊ कदम यांच्यासोबत हे नवे गाणे', असे तिने कॅप्शन मध्ये म्हटले आहे. सध्या तिच्या आगामी साँग अल्बमची वाट गौतमीचे चाहते करत आहेत.

गौतमीने आपल्या कारकिर्दीत अनेक साँग अल्बममध्ये काम केले आहे. 'सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम','कृष्ण मुरारी', 'रुपेरी वाळूत' अशा अनेक हिट गाण्यांमध्ये तिने नृत्य सादर केले आहे. साँग अल्बम व्यतिरिक्त गौतमी पाटील 'देवमाणूस' या मालिकेतही झळकली होती.

# बुलडाणा जिल्हावासियांसाठी आनंदाची बातमी अखेर खामगांव-जालना रेल्वे मार्गासाठी भूमी (जमीन) अधिग्रहणाची अधिसूचना राजपत्र मध्ये प्रकाशीत...

## केंद्रियराज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी मानले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांचे आभार

**जनसंचलन/बुलढाणा**

: खामगांव-जालना रेल्वे मार्गासाठी भूमी (जमीन ) अधिग्रहणाची अधिसूचना राजपत्र मध्ये प्रसिद्ध झाली आहे. ही बुलढाणा जिल्ह्यासाठी आनंदाची बातमी आहे जिल्ह्याचे खासदार व केंद्रीयराज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्याला यश आले असुन त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रिय रेल्वे अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहेत . बुलढाणा जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण ठरणारा आणि मध्य व सेंट्रल रेल्वेला जोडणारा महत्वकांशी असा खामगाव जालना रेल्वे मार्ग पुंजी निवेश कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आला आहे .या रेल्वे मार्गासाठी लागणारा ५०% निधीचा वाटा राज्य सरकारने उचलला असून त्या संदर्भाची तरतूद ही अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली आहे .त्यानंतर या संदर्भाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला होता .केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांच्यावतीने सातत्याने रेल्वेमंत्री आणि रेल्वेमंत्र्याकडे पाठपुरावा होता अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे .खामगाव जालना रेल्वे मार्गासाठी भूमी अधिग्रहण करणे हेतू अधिसूचना राजपत्रामध्ये प्रसिद्ध झाली आहे . रेल्वे (सुधारणा) अधिनियम २००८ च्या कलम ३७ अन्वये .. २६४७(). रेल्वे अधिनियम, १९८९ (१९८९ चा २४) च्या कलम २ च्या खंड (३७) अन्वये (ज्याचा यापुढे रेल्वे (सुधारणा) अधिनियम २००८ (२००८ चा क्र. ११) असा उल्लेख केला जाईल) प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, केंद्र सरकार याद्वारे ङ्ङजालना-खामगाव दरम्यान नवीन बीजी () मार्ग प्रकल्प (१६२ किमी)ङ्ङ यास, मध्य रेल्वे अंतर्गत ङ्ङविशेष रेल्वे प्रकल्पङ्ङ म्हणून अधिसूचित करते. ही अधिसूचना महाराष्ट्रातील जालना आणि खामगाव जिल्ह्यांमध्ये जमिनीचे संपादन करण्यासाठी आणि सार्वजनिक उद्देशाकरिता राष्ट्रीय पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी असून, ती या अधिसूचनेच्या राजपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल असे या राजपत्रामध्ये म्हटले आहे .



इंग्रज काळापासून प्रलंबित असलेला खामगाव जालना रेल्वे मार्ग व्हावा ही बुलढाणा जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांची मागणी होती .लोकसभेच्या अनेक निवडणुकीमध्ये खामगाव जालना रेल्वे मार्गाचा मुद्दा घेवून निवडणूक लढल्या जात होत्या . बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून सन २००९ मध्ये प्रथमच निवडून गेल्यानंतर खासदार प्रतापराव जाधव यांनी ही खामगाव जालना रेल्वे मार्गासाठी प्रयत्न सुरू केले होते लोकसभेत वेळोवेळी प्रश्न उपस्थित करून हा प्रश्न लावून धरला होता त्यामुळे या रेल्वेच्या सर्वेक्षणाला मंजुरात मिळाली त्यानंतर हा रेल्वे मार्ग पुंजी निवेश कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात संदर्भात केंद्र सरकारने तत्वतः मान्यता दिली त्यानंतर हा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारकडे पाठविण्यात आला होता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व तत्कालीन उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांच्याकडे पाठपुरावा करून या रेल्वे मार्गासाठी ५०% निधीची तरतूद करून यासंदर्भातील प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला होता . केंद्र सरकारचा ५०% हिस्सा मिळवण्याच्या दृष्टिकोनातून केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या सातत्याने भेटी घेवुन या रेल्वे मार्गाचा संदर्भात पाठपुरावा करत होते या संदर्भातील प्रस्ताव अर्थमंत्रालयाकडे पाठवण्यात आला होता . अखेर खामगांव-जालना या रेल्वे मार्गासाठी भूमी जमीन अधिग्रहणाची अधिसूचना राजपत्र मध्ये प्रसिद्ध झाली आहे. ही बुलढाणा जिल्ह्यासाठी आनंदाची बातमी आहे .पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये खामगाव येथे जाहीर झालेल्या जाहीर सभेत हा रेल्वे मार्ग पूर्ण करणार असल्याचे अभिवचन जिल्हावासियांना दिले होते. या रेल्वे मार्ग साठी भूमी अधिग्रहणाची अधिसूचना राजपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीयरेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे बुलढाण्याचे खासदार तथा केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आभार मानले आहेत .

---

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतीगृह, मोताळा येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

**जनसंचलन/बुलढाणा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य अंतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय मुलींचे वसतीगृह, मोताळा (जि. बुलढाणा) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. वसतीगृह प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, शालेय विभागातील विद्यार्थिनींसाठी प्रवेश अर्ज करण्याची मुदत १ जून ते ३० जून २०२६ अशी असून, इयत्ता ११ वी तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १५ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहेत. शालेय विभाग, कनिष्ठ महाविद्यालयीन विभाग तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी उपलब्ध रिक्त जागांवर गुणवत्ता व प्रवर्गनिहाय प्रवेश दिला जाणार आहे. वसतीगृहामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्गीय



तसेच खुल्या प्रवर्गातील अपंग आणि अनाथ विद्यार्थिनींना शासनाने निर्धारित केलेल्या आरक्षणाच्या प्रमाणानुसार प्रवेश दिला जाईल. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थिनींनी www.hmas.mahait.org या संकेतस्थळावर जाऊन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वसतीगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन वसतीगृह प्रशासनाने केले आहे. जास्तीत जास्त मागासवर्गीय व गरजू विद्यार्थिनींना वसतीगृह योजनेचा लाभ मिळावा तसेच कोणतीही पात्र विद्यार्थिनी या सुविधेपासून वंचित राहू नये, यासाठी वेळेत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जोखीमग्रस्त तालखेड गावात २१३ नागरिकांची मोफत एक्स-रे तपासणी...

**जनसंचलन/बुलढाणा**

माझे गाव, आरोग्य संपन्न गावङ्ङ तसेच टीबी मुक्त भारत अभियानाच्या १०० दिवसीय उपक्रमांतर्गत आणि कुष्ठरोग निर्मूलन मोहिमेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपरी गवळी यांच्या वतीने जोखीमग्रस्त तालखेड गावात क्षयरोग निदानासाठी मोफत एक्स-रे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरामध्ये नागरिकांना क्षयरोगाची लक्षणे, त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना, उपचारपद्धती तसेच नियमित तपासणीचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिकांना टीबी निर्मूलनाची शपथही देण्यात आली. या आरोग्य शिबिरादरम्यान जोखीमग्रस्त ( ) गटातील एकूण २१३ लाभार्थ्यांची मोफत एक्स-रे तपासणी करण्यात आली. त्यामुळे



संभाव्य क्षयरुग्णांचे लवकर निदान होण्यास मदत होणार असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले.शिबिराला तालखेडचे सरपंच मारोती कोल्हे, ग्रामपंचायत सदस्य मोहन सपकाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. आरोग्य विभागाकडून डॉ. अनिकेत चिंचोले (वैद्यकीय अधिकारी), डॉ. योगेश सरदार (समुदाय आरोग्य अधिकारी), अमोल देशमुख (वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक), सुभाष राजपूत (एक्स-रे टेक्निशियन), व्यवहारे (आरोग्य निरीक्षक), घडेकर (आरोग्यसेवक), प्रियंका इंगळे (आरोग्यसेविका), अंजना झगरे (आरोग्यसेविका) तसेच तालखेड येथील आशा स्वयंसेविकांनी सहभाग नोंदविला. टीबी मुक्त भारत अभियान यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या आरोग्य संस्थेशी संपर्क साधून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कर वसुलीत कडक, धनदांडग्यांसमोर नरम?

## चिखली नगर परिषदेच्या गाळ्यांवर अनधिकृत कब्जाचा आरोप!

जनसंचलन/ चिखली

सामान्य नागरिकांकडून कर वसुलीसाठी कठोर भूमिका घेणाऱ्या चिखली नगर परिषदेच्या कारभारावर आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. नगर परिषदेच्या मालकीच्या आठवडी बाजार परिसरातील व्यापारी संकुलातील काही गाळ्यांवर गेल्या अनेक वर्षांपासून नियमबाह्य कब्जा असल्याची चर्चा रंगली असून, या गाळ्यांचा वापर होत असतानाही पालिकेच्या तिजोरीत ना भाडे, ना कर जमा होत असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. शहराच्या विकासासाठी लाखो रुपये खर्च करून नगर परिषदेने व्यापारी संकुले उभारली; मात्र त्यातून महसूल मिळण्याऐवजी काही गाळे अनधिकृत वापराच्या विळख्यात अडकले आहेत. सुरुवातीला मटन व चिकन विक्रेत्यांना



देण्यात आलेले हे गाळे नंतर रिक्त झाले. पालिकेने ते ताब्यात घेऊन सील केल्याचे सांगितले जाते. मात्र काही भंगार व्यावसायिकांनी सील तोडून गाळ्यांवर कब्जा केल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, वर्षानुवर्षे वापर सुरू असूनही पालिका प्रशासन गप्प का? सामान्यांकडून कर वसुली करताना कडक भूमिका घेणारी नगर परिषद या प्रकरणात नरम का, असा सवाल नागरिक विचारत आहेत. भंगार दुकानांमुळे परिसरात घाण, कचरा व दुर्गंधी पसरत असल्याने तातडीने पाहणी करून अनधिकृत ताबा हटवावा, दुकाने सील करून दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# मेहकरखंडाळा परिसरावर विमानाच्या सलग घिरट्या नागरिकांमध्ये संभ्रम आणि भीतीचे वातावरण!

जनसंचलन/मेहकर

शहरासह खंडाळा, अंजनी, डोणगाव परिसराच्या आकाशात मंगळवारी सकाळी १० वाजल्यापासून एका विमानाने सलग २० पेक्षा अधिक घिरट्या घातल्याचा प्रकार समोर आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. विमान वारंवार त्याच परिसरावरून फेऱ्या मारत असल्याचे पाहून नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून काही ठिकाणी भीतीचे वातावरण पसरले आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित विमान बराच वेळ मेहकर शहर व खंडाळा परिसराच्या आकाशात घिरट्या घालत होते. विमानाचे हे अनोखे हालचाली पाहण्यासाठी अनेक नागरिक घरांच्या छतावर, मोकळ्या जागांमध्ये आणि रस्त्यावर जमा झाले. विमान इतक्या वेळ एकाच भागावरून का फिरत आहे, याबाबत नागरिकांमध्ये विविध चर्चा सुरू झाल्या आहेत. या घटनेचे दृश्य स्थानिक नागरिक गजानन राऊत यांनी आपल्या मोबाईलमध्ये कैद केले आहे. त्यांच्या मते, विमानाने केवळ एक-दोन नव्हे, तर सतत अनेक फेऱ्या घेतल्याने हा प्रकार सामान्य वाटत नाही. त्यामुळे नागरिकांच्या मनात भीती आणि कुतूहल दोन्ही निर्माण झाले आहे. दरम्यान, विमानाच्या या सलग घिरट्यांमागे नेमके कारण काय आहे, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. तांत्रिक तपासणी, हवाई सर्वेक्षण, प्रशिक्षण उड्डाण की इतर कोणते शासकीय काम, याबाबत नागरिकांकडून तर्क-वितर्क लावले जात आहेत. मात्र प्रशासन अथवा संबंधित यंत्रणेकडून स्पष्टता न आल्याने संभ्रम अधिकच वाढला आहे. वृत्त लिहिपर्यंत विमानाच्या फ ेऱ्या सुरू असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने या प्रकाराची दखल घेऊन नागरिकांना अधिकृत माहिती द्यावी, अशी मागणी होत आहे. विमानाच्या सलग घिरट्यांमुळे मेहकरखंडाळा परिसरात दिवसभर चर्चेचा विषय ठरला आहे.

# बुलढाण्यात शिक्षकाचा अचानक मृत्यू; उष्माघात की हार्ट अटॅक? तपास सुरू



जनसंचलन/बुलढाणा

शहरातील त्रिशरण चौक सामाजिक भवन, चिखली रोड येथे एका शिक्षकाचा अचानक मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. जगदेव गजानन शिंपणे वय ५४ वर्ष, रा. धामणदरी गौतम नगर, बुलढाणा असे मृत शिक्षकाचे नाव आहे. ते साखळी खुर्द येथे शिक्षक म्हणून कार्यरत होते. मिळालेल्या माहितीनुसार, त्रिशरण चौक सामाजिक भवन परिसरात त्यांची प्रकृती अचानक खालावली. त्यांना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या मृत्यूमागे उष्माघात कारणीभूत आहे की हार्ट अटॅक, याबाबत जिल्हा सामान्य रुग्णालयात वैद्यकीय तपासणी सुरू आहे. अचानक घडलेल्या या घटनेने शिक्षक वर्गासह परिसरातील नागरिकांत शोककळा पसरली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, त्यांच्या धर्मपत्नी या भोकरदन तालुक्यात पेपर देण्यासाठी गेल्या असल्याचे समजते. कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, शिंपणे सरांच्या निधनाने साखळी खुर्दसह बुलढाणा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेमुळे वाढत्या उन्हाचा तडाखा आणि आरोग्याबाबत नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# मेहकर तालुक्यात वादळी वाऱ्याचे थैमान; मोहना खुर्द येथे सौर पॅनेल उखडले, शेतकऱ्याचा लाखोंचा फटका!



जनसंचलन/मेहकर

तालुक्यात १ जून रोजी आलेल्या वादळी वाऱ्याने अक्षरशः धुमाकूळ घातला. या नैसर्गिक आपत्तीचा फटका शेतकऱ्यांच्या पिकांसह शेतातील महागड्या मालमत्तेलाही बसला आहे. मोहना खुर्द येथील शेतकरी अमोल जनार्धन खरात यांच्या शेतातील सौर ऊर्जा पॅनेल वादळात पूर्णपणे उखडून पडल्याने मोठे नुकसान झाले आहे. खरात यांच्या गट क्रमांक ६ मधील जनुना न शेंदला शेत शिवारातील विहिरीवर बसवलेले सोलर पॅनेल जोरदार वाऱ्याने खाली कोसळले. पॅनेलचे पत्रे, स्ट्रक्चर आणि बसवणीचे साहित्य मोडून चक्काचूर झाले असून, शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. आधीच अवकाळी पाऊस, वादळ आणि शेती खर्चाच्या कचाट्यात अडकलेल्या शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा आर्थिक संकट कोसळले आहे. शासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता महसूल व कृषी विभागामार्फत तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी अमोल खरात यांनी केली आहे. वादळ गेले, पण शेतकऱ्याच्या डोक्यावर संकटाचे काळे ढग कायम आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८